## निशाणी क्रमांक १०२ वरील आदेश

१. प्रस्तुतच्या अर्जाद्वारे वादी यांनी मयत प्रतिवादी क्र.२५ विरूध्द झालेला अबेटमेंटचा आदेश रद्द होवून मिळणेकरीता दाखल केलेला आहे.

२. वादीच्या मते, प्रस्तुत दाव्यातील प्रतिवादी क्र.२५ ललीता लवू भाईडकर ही दि.०१/०१/२०२४ रोजी मयत झाली आहे. प्रतिवादी क्र.२५ हीचा मृत्यू दाखला, वारसांची नावे व पत्ते वेळीच उपलब्ध न झालेने त्यांना तिचे वारस मुदतीत अभिलेखावर आणता आले नाहीत. त्यामुळे वादी यांना प्रतिवादी क्र.२५ हीचे वारस अभिलेखावर घेण्यास ४६४ दिवसांचा विलंब झालेला आहे. प्रतिवादी क्र.२५ हीचे वारस अभिलेखावर घेण्यामागे वादी यांचा कोणताही हेतू नव्हता. वादी यांनी सदरचा विलंब जाणुनबजून केलेला नाही. तसेच वादी क्र.१, ३ ते ९ व ११ ते १४ करीता कुलअखत्यारी वादी क्र.१० हे आजारी असल्यामुळे मुदतीत अर्ज दाखल करता आला नाही. त्यामुळे दावा प्रतिवादी क्र.२५ विरुध्द अबेट झालेला आहे. त्यामुळे वादीने प्रस्तुत अर्जाद्वारे प्रतिवादी क्र.२५ विरूध्द झालेला आबेटचा आदेश रद्द होवून मिळणेची विनंती केलेली आहे.

३. प्रतिवादी क्र. ११ ते १४ यांनी नि.१०८ कडे म्हणणे दाखल करुन अर्जास हरकत नोंदविलेली आहे. त्यांचे असे कथन आहे की, प्रस्तुतचा अर्ज खोटा व खोडसाळ असून प्रतिवादीस मान्य व कबूल नाही. अर्जात नमुद विलंबाचे कारण संयुक्तीक व योग्य नाही. अर्ज कायदयाने चालणारा नाही. अर्जामध्ये वादी क्र.१० हे कोणत्या आजाराने आजारी होती याबाबत खुलासा केलेला नाही. तसेच त्याबाबत वैदयकीय दाखला दाखल केलेला नाही. वादी यांनी न्यायालयाचा बहुमूल्य वेळ वाया घालवलेला असलेने रक्कम रुपये १०,०००/– इतका खर्च

आकारणेची विनंती केलेली आहे.

४. दोन्ही बाजूंचा युक्तीवाद ऐकला.

५. अर्ज, म्हणणे व अभिलेखाचे अवलोकन केले. वादीने प्रस्तुतचा दावा धडेवाटप व ठरावाकरीता दाखल केलेला आहे. प्रस्तुत अर्जाच्या पुष्ठयर्थ वादीने आपले प्रतिज्ञापत्र प्रस्तुत अर्जासोबत अभिलेखावर दाखल केलेले आहे. प्रतिवादी क्र.२५ विरूध्द सदरचा दावा अबेट झालेला आहे. दाव्याचा निकाल गुणदोषावर लागणेसाठी तसेच, नैसर्गिक न्यायतत्वाच्या आधारे मयत प्रतिवादी क्र.२५ हीचे वारस रेकॉर्डवर येणे गरजेचे आहे. त्यामुळे प्रतिवादीचे कोणतेही नुकसान होणार नाही. सबब वादीचा सदरचा अर्ज मंजुर करणेस कोणतीच हरकत दिसून येत नाही. त्यामुळे मी खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

## आदेश

१. प्रस्तुतचा अर्ज रक्कम रूपये २००/- (रु.दोनशे मात्र) इतक्या खर्चाने मंजुर करणेत येत आहे.

२. प्रतिवादी क्र.२५ विरूध्द झालेला आबेटचा आदेश रद्द करण्यात येतो.

३. खर्चाची रक्कम सरकार भरणा करावी.

(आदेश खुल्या न्यायदालनात जाहीर.)

KUMBHAR RANJANA GOVIND
Digitally signed by KUMBHAR RANJANA GOVIND
Date: 2025.11.20 18:03:48 +0530

दिनांक- २०/११/२०२५ (श्रीमती आर.जी.कुंभार)

ठिकाण- सावंतवाडी सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर),

सावंतवाडी.